# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date – 19 December 2024
## Time 7.10 AM to 7.20 AM
## Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक १९ डिसेंबर २०२४ सकाळी ७.१० मि.

****

- केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या विधानावरून संसदेत गदारोळ–काँग्रेस दिशाभूल करत असल्याचा आरोप करत, आपलं पूर्ण विधान ऐकण्याचं शहा यांचं आवाहन
- विधान परिषदेच्या सभापती पदी राम शिंदे यांची बिनविरोध निवड निश्चित
- मुंबईत घारापुरी लेण्यांकडे जाणारी बोट उलटून १३ जणांचा मृत्यू
- जालना इथं सोनोग्राफी मशीनची विक्री करणाऱ्या तीन जणांना अटक
- साहित्य अकादमीच्या वार्षिक पुरस्कारांची घोषणा–ज्येष्ठ समीक्षक सुधीर रसाळ यांना 'विंदांचे गद्यरूप' या समीक्षेसाठी पुरस्कार जाहीर

आणि

- अष्टपैलू क्रिकेटपटू रविचंद्रन अश्विन आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त

****

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबाबत आक्षेपार्ह विधान केल्याचा आरोप करत, विरोधकांनी केलेल्या गदारोळामुळे संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज काल बाधित झालं. राज्यसभेत संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी तर लोकसभेत संसदीय कामकाज राज्यमंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी, वस्तुस्थिती मांडण्याचा प्रयत्न केला, मात्र दोन्ही बाजूंनी घोषणा सुरु राहिल्याने दोन्ही सदनांचं कामकाज प्रथम दोन वाजेपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी कामकाज तहकूब करण्यात आलं.

दरम्यान, विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी पत्रकार परिषदेत बोलतांना, अमित शहा यांना मंत्रिमंडळातून काढून टाकण्याची मागणी केली.

अमित शहा यांनीही पत्रकार परिषद घेत, काँग्रेस पक्ष आपल्या विधानाची काटछाट करून जनमानसांत संभ्रम पसरवत असल्याचं, सांगत आपलं पूर्ण विधान जनतेसमोर ठेवण्याचं आवाहन प्रसारमाध्यमांना केलं. ते म्हणाले,

***''काँग्रेस पार्टीने फिर एक बार अपनी पुरानी पद्धती को आजमाते हुए बातो को तोड मरोडकर और सत्य को असत्य के कपडे पहनाकर समाज मे भ्रांती फैलाने का एक कुत्सित प्रयास किया। राज्यसभा मे मेरे बयान को तोड मरोडकर पेश किया गया। मै स्पष्टता के साथ कहना चाहता हूं, मेडिया को विनंती भी करना चाहता हूं कि मेरा पुरा बयान जनता के सामने रखिये।''***

****

एक राष्ट्र एक निवडणूक विधेयकासाठी संयुक्त संसदीय समिती – जेपीसीची स्थापना करण्यात आली आहे. या समितीमध्ये ३१ खासदारांचा समावेश असून, त्यात लोकसभेतले २१ आणि राज्यसभेतले १० सदस्य आहेत. ही समिती अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या शेवटच्या आठवड्याच्या, पहिल्या दिवशी आपला अहवाल सादर करेल.

****

नक्षलवादाला आळा घालण्यासाठी, 'महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयक-२०२४' मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विधानसभेत सादर केलं. राज्यातल्या नक्षल विरोधी पथकानं केलेल्या मागणीनुसार हे विधेयक आणत असल्याचं त्यांनी सांगितलं. या विधेयकावर व्यापक चर्चा होण्यासाठी ते संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठवण्याची शिफारस फडणवीस यांनी केली.

****

वस्तू आणि सेवा कराच्या संदर्भात २०१७ ते २०२० या तीन आर्थिक वर्षातला व्याज किंवा दंड किंवा दोन्हीही माफ करण्यासाठीची अभय योजना राज्य सरकारनं लागू केली आहे. संबंधित व्यापाऱ्यांनी या अभय योजनेचा लाभ घ्यावा, असं आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केलं. ते काल विधानसभेत बोलत होते. यासंदर्भातली विवादित रक्कम ५४ हजार कोटी रुपये एवढी आहे.

दरम्यान, काल विधानसभेत विद्यापीठ सुधारणा विधेयक, वस्तू आणि सेवा कायदा दुरुस्ती, मुद्रांक शुल्क वाढ विधेयक आवाजी मतदानानं मंजूर झालं.

****

परभणी आणि बीड प्रकरणी काल विधानसभेत चर्चा सुरु झाली. काँग्रेसचे नितीन राऊत यांनी चर्चेला सुरुवात केली. परभणीतल्या घटनेनंतर अमानुष मारहाण करणाऱ्या पोलिस अधिकाऱ्यांवर कारवाई कधी करणार असा सवाल त्यांनी केला. शांतता प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न करणाऱ्यांवरही गुन्हे दाखल केल्याकडे त्यांनी लक्ष वेधलं. पोलिस कोठडीत दगावलेल्या सोमनाथ सूर्यवंशीच्या कुटुंबियांना पन्नास लाख रुपयांची मदत आणि सरकारी नोकरी द्यावी, अशी मागणी राऊत यांनी केली. या सगळ्या प्रकरणाची चौकशी विशेष तपास पथक नेमून अथवा सी आय डी मार्फत करावी, अशी मागणीही त्यांनी केली. दरम्यान, संतोष देशमुख हत्याप्रकरणी अन्य एक आरोपी विष्णू चाटे याला पोलिसांनी अटक केल्याचं वृत्त आहे.

****

परभणी इथं हिंसाचारादरम्यान झालेल्या नुकसानापोटी कोणत्याही प्रथम माहिती अहवालाशिवाय पंचनामे करुन व्यापाऱ्यांना भरपाई देण्यात यावी, या प्रकरणात नागरिकांच्या तक्रारी असलेल्या तीन पोलीस अधिकाऱ्यांना तत्काळ सक्तीच्या रजेवर पाठवण्याचे आदेश, राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे उपाध्यक्ष तथा विधीज्ञ धर्मपाल मेश्राम यांनी दिले आहेत. ते काल परभणी इथं पत्रकार परिषदेत बोलत होते. विस्तारीत जाणारी सामाजिक दरी कमी करण्यासाठी सर्वांनीच सामाजिक सलोखा आणि शांततेसाठी पुढाकार घेण्याचं आवाहन मेश्राम यांनी केलं.

****

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्यावतीने घेण्यात आलेल्या महाराष्ट्र स्थापत्य अधिकारी सेवा मुख्य परीक्षेचा निकाल त्वरित जाहीर करावा, अशी मागणी मराठवाडा पदवीधर मतदारसंघाचे आमदार सतीश चव्हाण यांनी केली आहे. ते काल विधान परिषदेत बोलत होते. महाराष्ट्र स्थापत्य अधिकारी सेवेच्या ४९५ पदांसाठी २८ जानेवारी २०२४ रोजी मुख्य परीक्षा घेण्यात आली होती.

****

राज्य विधान परिषदेच्या सभापतिपदी महायुतीचे प्राध्यापक राम शिंदे यांची बिनविरोध निवड निश्चित झाली आहे. या पदासाठी राम शिंदे यांचा एकमेव अर्ज कालच्या विहित मुदतीत दाखल झाला. त्यामुळे त्यांच्या बिनविरोध निवडीचा मार्ग मोकळा झाला आहे.

****

मुंबईत गेट वे ऑफ इंडियावरून घारापुरी लेण्यांकडे निघालेल्या बोटीला उरण इथं झालेल्या अपघातात १३ जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये १० नागरिक आणि नौदलाच्या तीन कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. मृतांच्या वारसांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून ५ लाख रुपयांची मदत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केली. या घटनेची नौदल आणि राज्य सरकारमार्फत चौकशी केली जाईल, असं फडणवीस यांनी सांगितलं.

****

जालना इथं अंबड चौफुली रस्त्यावर सोनोग्राफी मशीनची विक्री करणाऱ्या तीन जणांना पोलिस आणि आरोग्य विभागाच्या पथकाने काल अटक केली. नोंदणीकृत रेडिऑलॉजिस्टलाच अशा प्रकारची मशीन विकत घेऊन वापर करता येतो. दरम्यान, या तिघांपैकी एक आरोपी, अवैध गर्भलिंगनिदान प्रकरणात सध्या बीड तुरुंगात असलेल्या डॉ. सतीश गवारे यांचा साथीदार असल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

साहित्य अकादमीचे वार्षिक पुरस्कार काल जाहीर झाले. आठ कवितासंग्रह, तीन कादंबऱ्या, दोन कथासंग्रह, तीन निबंध, तीन समीक्षाग्रंथ, एक नाटक आणि एक संशोधन ग्रंथ अशा २१ साहित्यकृतींना हे पुरस्कार घोषित करण्यात आले. ताम्रपट, शाल आणि एक लाख रुपये असं या पुरस्काराचं स्वरूप असून, आठ मार्च २०२५ रोजी दिल्लीत एका कार्यक्रमात हे पुरस्कार समारंभपूर्वक प्रदान केले जाणार आहेत. छत्रपती संभाजीनगर इथले ज्येष्ठ समीक्षक डॉ. सुधीर रसाळ यांना 'विंदांचे गद्यरूप' या समीक्षेसाठी हा पुरस्कार जाहीर झाला आहे. या पुरस्काराबद्दल रसाळ यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या...

> ***''हा मराठीला मिळणारा सर्वोच्च पुरस्कार मी मानतो. साहित्य अकादमीचा पुरस्कार हा सर्वोच्च पुरस्कार मी मानतो. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, बा. सी. मर्ढेकर, प्रभाकर शास्त्री अशा महान विचारवंत टीकाकारांना जो परस्कार मिळाला तो मलाही मिळाला याचा मला विशेष आनंद होतो.''***

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी डॉ रसाळ यांचं अभिनंदन केलं आहे. या पुरस्कारामुळे एका व्रतस्थ साहित्यिकाचा सन्मान होत आहे, या शब्दात फडणवीस यांनी आनंद व्यक्त केला.

****

क्रिकेटपटू रविचंद्रन अश्विननं आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली. काल ऑस्ट्रेलियात ब्रिस्बेन इथं पत्रकार परिषदेत अश्विननं या निर्णयाची माहिती दिली. ऑस्ट्रेलियात सुरू असलेल्या बॉर्डर – गावसकर कसोटी मालिकेतल्या पहिल्या सामन्यात अश्विननं ५३ धावांत १ बळी घेतला होता. अश्विनच्या क्रिकेट कारकिर्दीचा आढावा घेणारा हा संक्षिप्त वृत्तांत..

> ***''६ नोव्हेंबर २०११ रोजी दिल्लीत वेस्ट इंडिजविरोधात आपला पहिला क्रिकेट कसोटी सामना खेळलेल्या अश्विननं एकूण १०६ कसोटी सामन्यांत ५३७ बळी घेतले. कसोटी क्रिकेटमध्ये अनिल कुंबळे पाठोपाठ सर्वाधिक बळी घेणारा तो दुसरा भारतीय गोलंदाज ठरला. कसोटी क्रिकेटमध्ये ६ शतकं आणि १४ अर्धशतकंही त्याच्या नावावर आहेत. याशिवाय, एकदिवसीय क्रिकेट सामन्यांमध्ये १५६ बळी तर टी ट्वेंटी सामन्यांमध्ये त्याने ७२ बळी घेतलेत. ३०० कसोटी बळी आणि तीन हजार धावा अशी अष्टपैलू कामगिरी करणारा अश्विन क्रिकेट जगतातला ११वा खेळाडू ठरला, तर ११ वेळा मालिकावीर किताब पटकावत अश्विननं मुथय्या मुरलीधरनच्या विक्रमाशी बरोबरी साधली होती. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेत असलो तरीही, व्यावसायिक टी ट्वेंटी क्रिकेट खेळत राहणार असल्याचं अश्विननं जाहीर केलं आहे.''***

दरम्यान, बॉर्डर–गावस्कर मालिकेतला तिसरा कसोटी सामना काल अनिर्णित राहिला. पाच सामन्यांच्या मालिकेत दोन्ही संघ एक – एकनं बरोबरीत असून, मालिकेतला चौथा सामना मेलबर्न इथं २६ तारखेपासून खेळवण्यात येणार आहे.

****

परभणी जिल्ह्यात निर्यातवाढीस चालना मिळण्यासाठी जिल्हास्तरीय निर्यात प्रचालन ही एक दिवसीय कार्यशाळा काल घेण्यात आली. जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे

यांच्या हस्ते या कार्यशाळेचं उद्घाटन झालं. परभणी जिल्हा मराठवाड्यात हा निर्यातीमध्ये दुसऱ्या क्रमांकावर असल्याचं गावडे यांनी सांगितलं.

****

केंद्रीय सार्वजनिक तक्रार निवारण तसंच निवृत्तीवेतन विभागामार्फत आजपासून सुशासन सप्ताहाचं आयोजन करण्यात आलं आहे. या आठवड्यात आयोजित विविध शिबिरांमध्ये नागरिकांनी मोठ्यासंख्येने सहभागी होण्याचं आवाहन नांदेडचे जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी केलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या वतीने राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मुलन मोहिमेंतर्गत कुष्ठरोग तपासणी मोहीम सुरु आहे. उद्यापर्यंत चालणाऱ्या या मोहिमेत महानगरपालिका हद्दीतल्या सात हजार  संशयितांची तपासणी केली जाणार आहे.

****